नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

**दिनांक २९/०९/२०२२ (गुरूवार)**

**(दुपार)**

---

## विनयभंग करणाऱ्या आरोपीला कोर्टातुन शिक्षा

**पो.स्टे. बुटीबोरी** :– दिनांक ०९/०५/२०१९ चे ०७.२३ वा. दरम्यान फिर्यादी यांच्या रिपोर्ट वरुन पो.स्टे. बुटीबोरी येथे अप. क्र. २२९/२०१८ कलम ४५२, ३५४(अ) भादवी सहकलम ८ पोक्सो कायद्यान्वये गुन्हा नोंद झालेला होता.

दिनांक ०९/०५/२०१९ चे ०२.०० वा. सुमारास आरोपी नामे– सदाम हफीस अंसारी, वय २० वर्ष, रा. बोरखेडी याने फिर्यादी/पीडित वय १६ वर्ष हिचे राहते घरी प्रवेश करून तिचे मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून तिचा विनयभंग केला. आरोपीला दि. ०९.०५.२०१९ चे ११.५३ वा. रोजी अटक करण्यात आली आहे.

सदर प्रकरण्याचे तपास तत्कालीन मपोउपनि श्रीमती वंजारी यांनी करून सदर प्रकरण न्याय प्रविष्ठाकरीता मा. कोर्टमध्ये सादर केले. आज दिंनाक २९/०९/२०२२ रोजी मा. कोर्ट विद्यमान न्यायाधीश श्री ओ.पी.जयस्वाल, न्यायाधिश, नागपूर यांनी वरील नमुद आरोपीला कलम ४५२ भादवी मध्ये १ वर्ष सश्रम कारावास व ५००/– रू. दंड व दंड न भरल्यास १५ दिवस सश्रम कारावास सहकलम ८ पोक्सो मध्ये ३ वर्ष सश्रम कारावास व १०००/– रू. दंड व दंड न भरल्यास १ महिना सश्रम कारावास तसेच कलम ३५४ अ भादवी ८ पोक्सो प्रमाण सारखी शिक्षा ठोठावली आहे.

सरकारचे वतीने एपीपी श्रीमती रशमी खापर्डे यांनी काम पाहीले. कोर्ट कामात पैरवी अधिकारी म्हणुन मसपोनि श्रीमती शुभांगी वाझे, पोउपनि भवानीप्रसाद मिश्रा तर कर्मचारी सहा.फौज. श्री. सुनिल डोंगरे, पोहवा मनोज तिवारी, पोहवा अनिल व्यवहारे, पो. नाईक प्रकाश वर्मा यांनी मदत केली आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**